गोपनीय

**राज्य शासनाचे मंत्री व अधिकारी, राज्य विधानमंडळाचे सदस्य आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, महामंडळे इत्यादींचे पदाधिकारी यांच्या विदेश दौऱ्यांसंबंधातील मार्गदर्शक सूचना.**

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक क्रमांक सीडीआर-१०८५/४६/३३/अकरा,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ ऑगस्ट, १९८६

### परिपत्रक

**पहा.**—(१) शासन पृष्ठांकन, सा.प्र.वि., क्र. सीडीआर-१०८२/२७८०/४८-अकरा, दिनांक २८ ऑक्टोबर, १९८२.
(२) शासन पृष्ठांकन, सा.प्र.वि., क्र. सीडीआर-१०८३/२००२/५९-अकरा, दिनांक २४ ऑक्टोबर, १९८३.
(३) शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र. सीडीआर-१०८३/१९१/१९-अकरा, दिनांक २६ ऑक्टोबर, १९८३.
(४) शासन परिपत्रक, सा. प्र.वि., क्र. सीडीआर-१०८४/२२०२/४८-अकरा, दिनांक ४ डिसेंबर, १९८४.
(५) शासन पृष्ठांकन, सा.प्र.वि., क्र. सीडीआर-१०८६/७९/अकरा, दिनांक १७ फेब्रुवारी, १९८६.

राज्य शासनाचे मंत्री व अधिकारी, राज्य विधानमंडळाचे सदस्य आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, महामंडळे इत्यादींचे पदाधिकारी यांच्या विदेश दौऱ्यांसंबंधात केंद्र शासनाच्या मंत्रिमंडळ सचिवालयाचे पत्र क्र. २१/१/१/८१-कॅब, दिनांक १६ ऑगस्ट, १९८२ अनुसार प्रसृत करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना शासन पृष्ठांकन, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०८२/२७८०/४८-अकरा, दिनांक २८ ऑक्टोबर, १९८२ व शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०८४/२२०२/४८-अकरा, दिनांक ४ डिसेंबर, १९८४ अन्वये पुन्हा निर्गमित करण्यात आल्या आहेत. विदेश दौऱ्याचे प्रस्ताव प्रयाणाच्या अपेक्षित दिनांकापूर्वी निदान तीन आठवडे आधी वित्त मंत्रालय, आर्थिक व्यवहार विभाग आणि संबंधित मंत्रालय/विभाग यांना पाठविण्याबाबतच्या सूचना केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाने त्यांचे पत्र क्रमांक एफ-१/४/इसी/८३, दिनांक ५ ऑक्टोबर, १९८३ अन्वये काढल्या आहेत. या सूचना शासन पृष्ठांकन, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०८३/२२०२/५६-अकरा, दिनांक २४ ऑक्टोबर, १९८३ नुसार निर्गमित केल्या आहेत.

२. विदेश दौऱ्यांबाबतीत स्पष्ट सूचना अस्तित्वात असूनही राज्य शासनाने पाठविलेल्या विदेश दौऱ्यांबाबतच्या प्रस्तावांतील खालील त्रुटी केंद्र शासनाने राज्य शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत :—

(एक) विदेश दौऱ्याबाबतचे प्रस्ताव फारच उशीरा प्राप्त होतात. असे प्रस्ताव प्रयाणाच्या अपेक्षित दिनांकापूर्वी निदान तीन आठवडे आधी वित्त मंत्रालय (आर्थिक व्यवहार विभाग) आणि केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयांना पाठविणे आवश्यक आहे,

(दोन) सर्वसाधारण स्वरूपाचे अभ्यास दौरे अद्यापही पुरस्कृत केले जातात, अस्तित्वात असलेल्या सूचनांशी हे विसंगत आहे,

(तीन) राज्यातील प्रकल्पांकरिता परकीय आर्थिक मदत मिळविण्यासाठी राज्य शासनाने विदेशी संस्थांशी विचारविनिमय किंवा पत्रव्यवहार करावयाचा नाही असे स्पष्ट आदेश असतानाही राज्यातील प्रकल्पांकरिता आर्थिक मदत मिळविण्यासाठी राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांचे दौरे पुरस्कृत केले जातात,

(चार) दौरा पूर्ण झाल्यानंतर तीन आठवड्यांच्या कालावधीत दौऱ्यांच्या कामकाजाचा अहवाल वित्त मंत्रालय, आर्थिक व्यवहार विभाग आणि त्यांच्या प्रती केंद्र शासनाच्या संबंधित मंत्रालयांना पाठविणे आवश्यक आहे. परंतु याचे अनुपालन केले जात नाही,

(पाच) विदेश दौऱ्याचे प्रस्ताव केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या कार्मिक व प्रशासनिक सुधारणा विभागाकडे फार उशीरा प्राप्त झाल्याने आणि या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी त्या विभागास उपलब्ध असलेला कालावधी अत्यल्प असल्याने केडर क्लिअरन्स मिळविण्यासाठी संबंधित अधिकारी, त्यांचे प्रतिनिधी अथवा हित-चिंतक दबाव आणतात. असे प्रस्ताव सचिव/मंत्री यांना सादर करावे लागत असल्याने त्यांची छाननी करण्यासाठी पुरेशा कालावधीची नितांत आवश्यकता असते. म्हणून असे प्रस्ताव निदान तीन आठवडे आधी पाठविणे आवश्यक आहे.

३. सर्व विभाग प्रमुख व मंत्रालयीन विभाग यांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी वर नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन केले जात आहे याची दक्षता घ्यावी.

४. मंत्रालयीन विभागांना आणखी अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी परिपत्रकातील आशय त्यांच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, महामंडळे, मंडळे आणि सांविधिक संस्था यांच्या निदर्शनास आणून द्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मीना करंडे,**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
शासनाचे सर्व सचिव,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग, का. क्र. ८,१०, १२-अ, १९, २०, २०-अ, २८ व ३४,
गृह विभाग (कार्यासन—पोल-१),
महसूल व वन विभाग (कार्यासन—फ-७), वित्त विभाग (का. क्र. ईएक्सपी-४, एसईआर-५),
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख.

*पत्राने.